# सोलापूर शहर पोलीस

## संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाचा मजकूर

सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय आस्थापनेवरील पोलीस भरती, 2022-2023 मध्ये पोलीस शिपाई पदासाठी दिनांक 19/06/2024 व दिनांक 20/06/2024 रोजी शारीरिक चाचणी घेण्यात आली असून, पोलीस शिपाई चालक पदासाठी दिनांक 21/06/2024 रोजी शारीरिक चाचणी घेण्यात आली आहे.

उपरोक्त तारखांना काही उमेदवारांना इतर घटकांमध्ये शारीरिक चाचणी असल्याने, अथवा काही अपरिहार्य कारणांमुळे उपस्थित राहणे शक्य झाले नाही. अशा सर्व उमेदवारांनी (पोलीस शिपाई / चालक पोलीस शिपाई) दिनांक 25/06/2024 रोजी सकाळी 06.00 वाजता परेड मैदान, पोलीस मुख्यालय, सोलापूर शहर येथे उपस्थित राहावे. येतांना सोबत दिनांक 19, 20 व 21/06/2024 रोजी इतर घटकांमध्ये शारीरिक चाचणीसाठी उपस्थित असल्याचा पुरावा सोबत आणावा.

सोलापूर शहर पोलीस घटकातील पोलीस शिपाई / चालक पोलीस शिपाई पदासाठी शारीरिक चाचणी देण्यासाठी ही अंतिम संधी असून, दिनांक 25/06/2024 रोजी सकाळी 06.00 वाजता परेड मैदान, पोलीस मुख्यालय, सोलापूर शहर येथे उपस्थित न राहील्यास उमेदवारांना कोणत्याही कारणासाठी अतिरीक्त कोणतीही संधी मिळणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(अजित **बो-हाडे**)<br>
पोलीस उप-आयुक्त, (मुख्यालय)<br>
सोलापूर शहर